EX/SCD/2019-20/06
dt 2/04/19

# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी क्र – ०२२ २६५४ ३०३५ / २६५३ ०२८३
ईमेल - cap.exam@mu.ac.in

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.

क्र. परीक्षा/कें.मु.कें./ ०६ /२०१९ दिनांक :– २ एप्रिल २०१९

परिपत्रक :-

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचलित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन, महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक/संचालक यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, प्रथम सत्र २०१९ च्या परीक्षा दि. २५ मार्च २०१९ पासून सुरू होत असून साधारण OSM प्रणाली मार्फत उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन करण्याचे काम दि. २९ मार्च २०१९ पासून सुरू करण्यात येणार आहे. अजून ब–याच महाविद्यालयांनी OSM (CAP) सुरू केलेली नाही तसेच विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, महाविद्यालयातील काही प्राध्यापकांनी OSM मध्ये नाव नोंदणी केलेली नाही. त्यामुळे ब–याच अभ्यासक्रमाचे निकाल महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ८९ अन्वये वेळेत घोषित करता येत नाहीत.

**OSM प्रणाली यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संस्था/महाविद्यालयांचे लक्ष पुढील सुचनेकडे वेधण्यात येत आहे.**

१. प्रत्येक महाविद्यालयाला CAP ( OSM) सेंटर सुरू करणे बंधनकारक आहे. (परिपत्रक क्र. DBOEE/आय.सी. एफ./२०१८–१९/४७७, दि. २६ फेब्रुवारी २०१९ पहावे.)

२. CAP ( OSM) सेंटर सुरू करण्याठी **७५०६८३९५९३** या नंबरवर संपर्क साधावा.

३. OSM प्रणालीत महाविद्यालयातील सर्व शिक्षकांचे नाव नोंदणी करणे आवश्यक आहे (कमीत कमी १ वर्ष शिकविण्याचा अनुभव) (परिपत्रक क्र. परीक्षा/के.मु.के./९६०/२०१८ दि. २८ सप्टेंबर २०१८ पहावे.).

..२/–

मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी क्र — ०२२ २६५४ ३०३५ / २६५३ ०२८३
ईमेल - cap.exam@mu.ac.in

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई— ४०० ०९८.



४. विद्यापीठाच्या असे लक्षात आले आहे की, OSM प्रणालीत शिक्षकांनी नाव नोंदणी करताना स्वत:च्या महाविद्यालयाच्या ऐवजी CAP सेंटरच्या महाविद्यालयाचे नाव लिहिले आहे. तसेच Bank Details देखील चुकीचे आहे. त्यामुळे सदर दुरूस्ती करण्याचे अधिकार फक्त शिक्षकांना असल्यामुळे सर्व शिक्षकांना विनंती करण्यात येते की, स्वत:च्या महाविद्यालयाचे नाव व Bank Details update करावी.

५. द्वितीय सत्र ऑक्टोबर २०१८ व त्यापूर्वी पुरविण्यात आलेल्या उत्तरपुस्तिका कृपया प्रथम सत्र मार्च २०१९ साठी वापरू नयेत प्रथम सत्र मार्च १९ साठी नवीन उत्तरपुस्तिका पुरविण्यात येतील.

६. मराठी, इंग्रजी आणि इतर भाषेतील लिहिलेल्या उत्तरपुस्तिका वेगळया गठ्ठयात बांधून विद्यापीठात पाठविण्यात याव्यात.

७. दिव्यांग (LD) विद्यार्थ्यांच्या उत्त्पुस्तिकेच्या पानावर दिव्यांग (LD) शिक्का सर्व पानांवर मारावा. व Attendance Sheet वर सुद्धा दिव्यांग ( LD) चा उल्लेख करावा.

८. सर्व परीक्षांच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा केंद्रावरील उपस्थिती हि online आणि Offline (जुन्या पध्दतीने) पाठवायचे आहेत online साठी link http://uom.tracmarks.com/FH 2019/ Login/index चा वापर करावा.

९. कॉपी केस बाबत ज्युनिअर सुपरवायझर व सिनियर सुपरवायझरनी स्पष्ट मत मांडून सदर प्रकरण विद्यापीठात स्वतंत्र पाकिटात पाठवावे आणि Attendance sheet वर सुद्धा उल्लेख करावा.

१०. CAP सेंटर सकाळी ७.३० ते रात्री ९.०० पर्यंत सुरू ठेवावे.

# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी क्र — ०२२ २६५४ ३०३५ / २६५३ ०२८३
ईमेल - cap.exam@mu.ac.in

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई— ४०० ०९८.




११. महाविद्यालयाने त्यांच्या महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नोंदणी असलेल्या विद्यार्थी संख्येच्या कमीत कमी दीडपट मुल्यांकन (उदा. १०० नोंदणीकृत विद्यार्थी संख्येच्या १.५ पट गुणीले एकूण विषय म्हणजे १००X१.५ X ६ = ९००) करणे आवश्यक आहे.

महाविद्यालयाने प्रत्येक परीक्षेसाठी तपासलेल्या उत्तरपुस्तिका व प्राध्यापकांची संख्या याबाबत उपकुलसचिव, केंद्रिय मुल्यांकन कक्ष, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ यांचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. सदरचे प्रमाणपत्र हे संलग्नता (Affiliation), नियमितता (Continuation), नैसर्गिक वाढ (Natural Growth), प्रवेश क्षमता (Intake Capacity), पदव्युत्तर केंद्र/ संशोधन केंद्र (PG Center/Research Center) आणि विद्यार्थ्यांच्या Enrollment/ Eligibility इत्यादी बाबत विद्यापीठास प्रस्ताव सादर करताना आवश्यक राहिल याची सर्व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

डॉ. विनोद पाटील.
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत माहितीकरिता रवाना :—
१. मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२
२. मा. प्र. कुलगुरूंचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२
३. मा. संचालकांचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई — ४०० ०९८
४. मा. वित्त व लेखा अधिकारी, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई — ४०० ०९८,
५. मा. संचालक यांचे स्वीय सहायक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई — ४०० ०९८.
६. श्री. विनोद मळाळे, उपकुलसचिव, (जनसपंर्क अधिकारी),मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई — ४०० ०९८.